# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्र. ३७/२०१८

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणारा निदेश, २०१८.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे. (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७)(याला अधिनियम असे संबोधीण्यात येईल) ;

**आणि**

**ज्याअर्थी,** वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** विद्यापीठाच्या व्यवस्थापन परीषदेने दिनांक ०७/०५/२०१८ च्या सभेमध्ये बाब क्र. ४ अंतर्गत विद्यापीठाच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळ सेवा भरतीसाठी लेखी चाचणी परीक्षेचे आणि पद वर्ग ३ च्या सरळसेवा भरतीसाठी संगणकीय चाचणी परीक्षेचे आयोजन करण्याचा निर्णय घेऊन या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, वस्तुनिष्ठ बहूपर्याची प्रश्नांची संख्या, परीक्षा घेण्यासाठी दिला जाणारा वेळ आणि परीक्षेचे वर्गनिहाय वेळापत्रक सादर केले जाण्यासाठी प्र–कुलगुरुंचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समितीचे गठन करुन अहवाल सादर करण्यासंबधी निर्देशित केले होते आणि समितीच्या अहवालीतील शिफारशी मा. कुलगुरुंनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अंतर्गत मान्य करुन कार्यवाही सुरु केल्या जाण्याचा निर्णय घेतला होता;

**आणि**

**ज्याअर्थी,** व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल दिनांक २१/०६/२०१८ रोजी कुलगुरुंना सादर करण्यात आला होता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** कुलगुरुंनी दिनांक १५/१०/२०१८ रोजी सदर अहवालाबाबत ''गठीत समितीने सादर केलेला प्रारुप अभ्यासक्रम परीक्षेच्या स्वरुपाप्रमाणे परीपुर्ण वाटत नाही करीता पुर्न:विचाराची

गरज असल्यामुळे काही तज्ञ व्यक्तीचा समावेश करुन अभ्यासक्रमाला अंतीमरुप देण्याची आवश्यकता आहे.'' असे आदेश देऊन व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या चार सदस्यीय समितीमध्ये मराठी, इंग्रजी आणि गणित या विषयांचे आणखी पाच तज्ञ समाविष्ठ करुन प्राप्त अहवालावर पुर्न:विचार करुन अहवाल सादर करण्याचे निर्देशित केले होते;

**आणि**

**ज्याअर्थी,** नवनियुक्त समितीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींचा आणि व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालावर विचार करुन दिनांक ३/१२/२०१८ रोजी आपला अहवाल मा. कुलगुरुंच्या मान्यतेसाठी सादर केला होता;

**आणि**

**ज्याअर्थी,** मा. कुलगुरुंनी दिनांक ०५/१२/२०१८ रोजी नवनियुक्त समितीकडून प्राप्त झालेला अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) च्या तरतुदी अंतर्गत व्यवस्थापन परीषदेच्या वतीने दुरुस्तीसह मान्य केला होता;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १७ (५) (क) आणि (ग) मधील तरतुदी अंतर्गत चाचणी परीक्षा घेणे, मुल्यमापन करणे व त्यांचे निकाल जाहीर करणे तसेच त्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यासाठी संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना मुख्य प्रभारी अधिकारी म्हणुन जबाबदार मानले आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ७३ (५) मधील तरतुदी अंतर्गत परीक्षा, इतर चाचण्या घेणे व मूल्यमापन करणे आणि ज्यामधून परिक्षकांना उमेदवारांचे मुल्यमापन करता येईल किंवा त्यांची परीक्षा घेता येईल अशी रीत निर्धारीत करण्याचा विषय हा अध्यादेशाद्वारे नियमित होणारा आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** या संबधातील चाचणी परीक्षा घेण्यासंबधीचा अध्यादेश विद्यापीठामध्ये तयार करण्यात आलेला नाही ;

**आणि**

**ज्याअर्थी,** या संबधातील चाचणी परीक्षा घेण्यासंबधीचा अध्यादेश तयार करण्याची पध्दती ही वेळ खाऊ स्वरुपाची आहे ;